राष्ट्रोद्धाराय तंत्र शिक्षणम्
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४
Email ID: ropune@dtemaharashtra.gov.in

महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,पुणे
४१२, ई, शिवाजीनगर, पुणे-४११ ०१६.

**कालमर्यादा – दि. १५/०९/२०२१**
**परिपत्रक**

जा.क्र. : तंशिविकापु/आस्था-३(अ)/सुसेआप्रयो/२०२१/ 3799
दिनांक : 30 AUG 2021

विषय :- सातव्या वेतन आयोगामध्ये तीन लाभांच्या सुधारीत सेवातंर्गत आश्वासित प्रगती योजनाच्या अनुज्ञेयतेबाबत गट क व ड पदावर कार्यरत कर्मचाऱ्याची माहिती ---

संदर्भ :- शासन निर्णय,वित्त विभाग निर्णय क्रमांक वेतन १११९/प्र.क्रं.३/२०१९/सेवा-३,दि.०२/०३/२०१९

सर्व संस्था प्रमुख / कार्यालय प्रमुख यांना कळविण्यात येते की, उपरोक्त संदर्भाच्या शासन निर्णयातील तरतूदी नुसार आपल्या संस्थेतील / कार्यालयातील गट-क व गट-ड संवर्गातील कर्मचाऱ्यांना सुधारीत सेवातंर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करणाकरीता ज्या कर्मचाऱ्यांना दिनाक ०१/०४/२०२१ ते ३१/०३/२०२२ पर्यतच्या कालावधीत सेवेची १०/२०/३० वर्ष पूर्ण होत आहेत. अशा कर्मचा-यांची माहिती सोबतच्या विवरणपत्रा मध्ये या कार्यालयास दिनांक १५ सप्टेंबर २०२१ पर्यंत सादर करावी. तसेच कर्मचा-यांचा मागील पाच वर्षांच्या गोपनीय अहवालाचा तपशील विवरणपत्रा मध्ये नमूद करावा. प्रस्तावासोबत मागासवर्गीय कर्मचा-यांच्या बाबतीत जात वैधता प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत सादर करावी. गट-क व गट-ड संवर्गातील कर्मचा-यांची माहिती स्वतंत्र प्रपत्रात सादर करण्यात यावी. तसेच सदरची माहिती **Excell Sheet DV-TTYogesh** या फॉन्टमध्ये **A3** साईज पेपरवर तयार करावी, तसेच ई-मेल द्वारे est.ropune@gmail.com या पत्त्यावर सॉफ्टकॉपी सुद्धा पाठवावी.

सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेची बैठक ऑक्टोबर महिन्यात प्रस्तावित असल्याने सदरची माहिती सादर करतांना खालील बाबींची तपासणी करण्यात येवून अचूक माहिती सादर करावी.

१. सेवेतील प्रथम नियुक्तीचा दिनांक, पदनाम, जन्म दिनांक
२. असाधरण रजा (विनावेतन) असल्यास त्या त्या कालावधीचा तपशील
३. कर्मचाऱ्यास सेवा कालावधीत प्रत्यक्ष पदोन्नती/ प्रत्यक्ष देण्यात आलेले लाभ यांची गणना करुन माहिती सादर करावी.
४. ज्या दिनांकास १०/२०/३० नुसार कर्मचारी लाभास पात्र होत असेल त्या दिनांकानुसार मत्ता व दायित्वे सादर केल्याची नोंद घ्यावी.
५. ज्या दिनांकास १०/२०/३० नुसार कर्मचारी लाभास पात्र होत असेल त्या दिनांकानुसार मागील ५ वर्षांचे गोपणीय अहवालाची प्रतवारी सादर करण्यात यावी.

(कृ. मा. प.)

६. सेवापुस्तकात घेण्यात आलेल्या नोंदींच्या अनुषंगाने संगणक अर्हता, मराठी/हिंदी/ भाषा सूट, विभागीय परीक्षा उत्तीर्ण अथवा सूट (लिपीकवर्गीय कर्मचाऱ्यांसाठी), जातवैधता प्रमाणपत्र नोंद,

पहिला लाभ/दुसरा लाभ मिळाल्यांच्या नोंदी, चारित्र्य पडताळणी नोंद इत्यादी ठिकाणी फ्लॅग लावण्यात यावेत.

सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या पहिल्या लाभासाठी यापूर्वी सादर केलेले प्रस्ताव, गोपनीय अहवाल उपलब्ध न झाल्यामुळे तसेच दि. १३/०२/२०१४ रोजीच्या शासन निर्णयानुसार गोपनीय अहवालांवर अभिवेदन सादर करण्याची संधी देण्यात आलेल्या कर्मचा-यांचे प्रस्ताव, त्याचप्रमाणे जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त नसल्यामुळे प्रस्ताव प्रलंबित राहिले असल्यास, त्याबाबत आवश्यक ती पूर्तता करुन, अशा कर्मचा-यांचे प्रस्ताव पुन्हा सादर करण्यात यावेत.

**दिनांक १५ सप्टेंबर २०२१ नंतर प्राप्त होणारे प्रस्ताव तसेच प्रत्यक्ष बैठकीच्या वेळी सादर केले जाणारे नवीन प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.**

**सोबत : विवरणपत्र**

(डॉ. द. व्यं. जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

**प्रत : माहिती व पुढील कार्यावाहीसाठी –**

- संचालक, अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे.
- प्राचार्य शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड.
- प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी (खुर्द).
- प्राचार्य, शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, कराड.
- प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन पुणे / कराड / कोल्हापूर/ सोलापूर / मिरज / अवसरी (खुर्द).
- प्राचार्य, शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, तासगांव.
- प्राचार्य, शासकीय दूरशिक्षण तंत्रनिकेतन, पुणे.
- प्राचार्य, महाराष्ट्र राज्य इन्स्टिटयूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट ॲन्ड केटरिंग टेक्नॉलॉजी, पुणे.
- उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, पुणे.
- या कार्यालयातील प्रोग्रामर यांना संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.

# विवरणपत्र

संस्थेचे/कार्यालयाचे नाव-

| अ क्र | कर्मचा-याचे नांव, पदनाम व जन्मदिनांक | जातीचा प्रवर्ग मागासवर्गीय असल्यास जात वैधता प्रमाणपत्र आहे किंवा कसे ? (प्रत जोडण्यात यावी.) | शैक्षणिक अर्हता | प्रथम नियुक्तीचा दिनांक व पदनाम प्रथम नियुक्तीच्या दिनांकापासुन पदोन्नती झाली असल्यास लाभ मिळाला असल्यास, त्याबाबतचा तपशील दिनांकासहीत | सातवा वेतन आयोगानुसार १० वर्षानंतर पहिल्या लाभाचा दिनांक व देय लाभ (वेतन स्तरसह) | सातव्या वेतन आयोगानुसार २० वर्षानंतर (१२+ ८) दुसऱ्या लाभाचा दिनांक सातव्या वेतन आयोगाचा वेतनस्तर | सातव्या वेतन आयोगानुसार ३० वर्षानंतर (२४ + ६) तिसऱ्या लाभाचा दिनांक आणि सातव्या वेतन आयोगाचा वेतनस्तर | मराठी/हिंदी भाष सुट | जातवैधता प्रमाणपत्र | संगणक परीक्षा उत्तीर्ण/सूट बाबतचा तपशील | चारित्र्य पडताळणी झाली किंवा कसे ? | विभागीय परीक्षा उत्तीर्ण झाल्याचा दिनांक (लिपीक वर्गीय साठी) | पुर्वी पदोन्नती नाकारली किवा कसे ? असल्यास तपशील | मत्ता व दायित्व विवरणपत्र सादर केली आहेत किंवा कसे ? असल्यास संस्थेस सादर केल्याचा जावक क्रमांक व दिनांक | विभागीय चौकशी किंवा शिस्तभंग कार्यवाही चालू आहे किंवा कसे? चौकशी पुर्ण झाली असल्यास अथवा काही शिक्षा झाली असल्यास त्याचा तपशिल नमुद करावा/निलंबनाचा तपशिल | मागील पाच वर्षाच्या गोपनीय अहवालाची प्रतवारी | | | | | सरासरी प्रतवारी | संस्था प्रमुख कार्यालय प्रमुखांचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | ४ | ६ | ७ | ८ | ९ | १० | १९ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |

संस्था / कार्यालय प्रमुख यांची स्वाक्षरी